# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२ | पेपर कात्रण | दिनांक :- १३/०१/२०२३

------------------ºººººº------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस आयुक्त यांचा शेराः-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेराः-

३) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेराः-

CamScanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- १३/०१/२०२३ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १३.०१.२०२३ | लोकमत पान क्र. १ | ओमानमध्ये घरकामासाठी महिलेला डांबले | विशेष शाखा / वसई | |
| २. | १३.०१.२०२३ | लोकमत पान क्र. १ | बापाकडुन मुलीचा विनयभंग | तुळींज | |
| ३. | १३.०१.२०२३ | लोकमत पान क्र. १ | अल्पवयीन मुलीचे अपहरण | पेल्हार | |
| ४. | १३.०१.२०२३ | पुढारी पान क्र. ५ | भाईंदरमध्ये तरुणाची आत्महत्या | नवघर | |
| ५. | १३.०१.२०२३ | सकाळ पु. पान क्र. १ | पार्कींग सुविधा नसल्यास कारवाई नको | मिरा भाईंदर | |
| ६. | १३.०१.२०२३ | सामना पान क्र. ७ | भाईंदरमध्ये सवा लाख बेशिस्त वाहन चालकांची पावती फाडली | वा.शा. काशिमीरा | |
| ७. | १३.०१.२०२३ | पुढारी पान क्र. ३ | मिरा रोडमध्ये रिक्षाला आग | नवघर | |
| ८. | १३.०१.२०२३ | पुढारी पु. पान क्र. ४ | पॉलिसी रिन्युवलच्या नावाने फसवणारी टोळी जेरबंद | काशिमीरा | |
| ९. | १३.०१.२०२३ | सकाळ पु. पान क्र. १ | दुचाकी चोरांना वसईत अटक | पेल्हार | |

CS CamScanner

1) लोकमत पान क्र. 1 दि: 13/01/2023

पाच दिवसांत आणले देशात : विशेष शाखेला यश

# ओमानमध्ये घरकामासाठी महिलेला डांबले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ओमान येथे घरकामासाठी गेलेल्या वसईच्या ३० वर्षीय महिलेचा पासपोर्ट घेऊन तिला डांबून ठेवले होते. याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यावर आयुक्तालयाच्या विशेष शाखेच्या पोलिसांनी पाठपुरावा करत त्या महिलेची पाच दिवसांत सुखरूप सुटका करून भारतात आणण्यात यश मिळवले.

वसई कोळीवाड्याच्या साईदत्तनगरमध्ये राहणाऱ्या कमलावती पारस वर्मा (५०) यांची मुलगी अंजू वर्मा (३०) ही २५ ऑगस्टला मस्कत, ओमान या देशामध्ये नोकरीकरिता गेली होती. परंतु, सध्या तिला तेथे नोकरी करताना त्रास होत असल्याने तिला तेथे नोकरी करायची नव्हती. तसेच तिला भारतात परतायचे होते. परंतु, तिचा पासपोर्ट ओमानमधील एजंट प्रसन्ना याच्याकडे जमा होता. तो पासपोर्ट परत देण्यास नकार देत होता. ती तीन दिवसांपासून मस्कत, ओमान विमानतळावर थांबली असल्याचे आईने वसई पोलिस ठाण्यात ४ जानेवारीला तक्रार अर्जाद्वारे कळविले.



ओमानहून भारतात परतलेली अंजू वर्मा.

## एजंटचा पासपोर्ट, व्हिसाला नकार

हा अर्ज वसई पोलिस ठाणे यांच्याकडून विशेष शाखा, पारपत्र विभाग यांना मिळताच पारपत्र विभागाचे अधिकारी व अंमलदार यांनी तत्काळ वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ओमान, मस्कत येथे अडकलेल्या अंजू यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा एजंट प्रसन्ना याने अंजूचा पासपोर्ट दोन वर्षांकरिता वाढविला असून, त्यासाठी त्याचे पैसे खर्च झाल्याने तो तिला पासपोर्ट व व्हिसा देत नसल्याचे पोलिसांना कळले.

## भारतीय दूतावासाला विनंती

१ पोलिसांनी मस्कतमधील भारतीय दूतावासाला ई-मेल करून अंजूला मदत करण्याची विनंती केली. त्यांनी तिला आश्रय देत तेथील भारतीय दूतावासात पोहोचण्यास सांगितले.

२ भारतीय दूतावासाने तिच्या व्हिसा स्पॉन्सरशी संपर्क करून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून तेथील कायद्याप्रमाणे लेबर कोर्टात व्हिसा रद्द केल्याने अंजू ही ९ जानेवारीला सुखरूप भारतात परतली.

३ ही कामगिरी मुख्यालयाचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, विशेष शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक कुमारगौरव धादवड, महिला सहायक पोलिस निरीक्षक संजीवनी सोलनकर, पोलिस हवालदार मंजूषा गुप्ता व सीमा दाते यांनी पार पाडली.

## कंत्राट रद्द शिवाय जाऊ शकत नाही

ओमान देशात असा नियम आहे की, जर कंत्राटावर कामासाठी गेल्यावर जोपर्यंत कामगार कंत्राट रद्द करत नाही, तोपर्यंत तो परत जाऊ शकत नाही. पाठपुरावा केला व त्या महिलेला भारतात सुखरूप आणले, अशी माहिती पोलिस निरीक्षक कुमार धादवड यांनी दिली.

2) लोकमत पान क्र. 1

# बापाकडून मुलीचा विनयभंग

**नालासोपारा :** बापाने मुलीचा विनयभंग करून नात्याला काळिमा फासणारी आणि मन सुन्न करणारी घटना नालासोपारा येथे घडली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या पीडित १७ वर्षीय मुलीच्या असहायतेचा फायदा घेत ऑगस्ट २०२२ ते ५ जानेवारी २०२३ दरम्यान तिच्या वडिलांनीच अनेक वेळा विनयभंग केला. याबाबत पीडित मुलीने अनेक वेळा आपल्या आईला या घटनेची माहिती दिली होती. मात्र, आईने त्याकडे दुर्लक्ष केले होते. अखेर पीडित मुलीने तुळींज पोलिस ठाण्यात बुधवारी वडील व आईविरोधात दिलेल्या तक्रारीवरून विनयभंगासह पोक्सोचा गुन्हा दाखल केला आहे.

3) लोकमत पान क्र. 1

# अल्पवयीन मुलीचे अपहरण


**नालासोपारा :** नालासोपारा येथे १७ वर्षांच्या मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. सातीवली परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला १० जानेवारीला संध्याकाळी सातच्या सुमारास आरोपीने आमिष दाखवून आपल्यासोबत फूस लावून पळवून नेल्याचा संशय आल्याने मुलीच्या भावाने बुधवारी पेल्हार पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

4) पुढारी पान क्र. 5

दि. 13/01/2023

# भाईंदरमध्ये तरुणाची आत्महत्या




**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड - नवघर पोलीस ठाणे हद्दीत गेल्या महिन्यात एका तरुणाने भाईंदर रेल्वे स्थानकालगत आत्महत्या केली होती. त्या तरुणाने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या आत्महत्ये मागील कारण समजले नसून नवघर पोलिसांनी योग्य कारवाई केली नसल्यामुळे कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सचिन विरेंद्र चौहान (१९) हा तरुण वसई परिसरात राहत असून मजुरीचे काम करत होता. याअगोदर तो शहीजाबाद, गाजियापूर येथे फळ विक्रीचा व्यवसाय करत असताना त्याची गावात राहणाऱ्या एका तरुणीबरोबर मैत्री झाली होती. नंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले होते. सचिन काही दिवसांनी मुंबईला वसई येथे काम करण्यासाठी आला होता. त्याच्या पाठोपाठ ती तरुणीदेखील घरात कोणाला काही सांगता मुंबईला आली होती. त्यावेळी तिच्या घरच्यांनी उत्तर प्रदेश शहीजाबाद पोलीस ठाण्यात ती मिसिंग असल्याची तक्रार केली होती.

सचिन व ती तरुणी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी भाईंदरच्या नवघर पोलीस ठाण्यात आले व त्यांनी आपण एक मेकांवर प्रेम करत आहोत. गेल्या काही दिवसांपासून भांडण सुरू असल्याने त्याची मैत्रिण मुंबईला निघून आल्याचे पोलिसांना सांगितले होते. नवघर पोलिसांना सर्व माहिती दिल्या नांतर पोलिसांनी शहीजाबाद पोलीस स्टेशनला मिसिंग असलेली तरुणी इकडे मिळून आल्याचा रीतसर मेल करून कळवले व त्यांच्या आई वडिलांना इकडे येण्यास सांगण्यात आले होते. मात्र मुलीचे वडील रागात असल्याने आपण तीला घरात घेणार नसल्याचे त्यांनी सांगितल्याने पोलीसांनी तरुणीला उत्तन येथील आपल घर संस्थेत ठेवण्याचे ठरवले मात्र मुलीचे वय २० वर्षे असल्याने त्यांनी तिला ठेवण्यास नकार दिला त्यांनतर मिरारोड येथील अंकुर फाऊंडेशन येथे तिच्या राहण्याची सोय के ली मात्र तिकडे देखील वय जास्त असल्याने तीला ठेवण्यास नकार देण्यात आला होता.यानंतर त्या मुलीची बहिणीकडे राहण्यास ती तयार झाल्या नंतर पोलिसांनी तीला त्यांच्या सुपूर्द केले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तरुण पुन्हा पोलीस स्टेशनला आला व पोलीसांचे आभार मानत निघून गेला. मात्र दुपारच्या वेळी पुन्हा वसई वरून भाईंदरला आला व त्याने भाईंदर पूर्वेला स्टेशन लगत परिसरात जाऊन गळफास घेतल्याची घटना घडली होती. त्याच्या मृत्यूनंतर अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र त्याच्या आत्महत्येला नक्की कोण जबाबदार असेल, असा प्रश्न निर्माण झाला आहे व पोलिसांनी तरुणाला त्याच्या वडिलांच्या सुपुर्द केले असते तर त्याचे प्राण वाचले असते, अशी चर्चा सुरू आहे. ज्यावेळी तरुण प्रेयसीसोबत पोलीस ठाण्यात आला तेव्हा माहिती देताना त्याने त्याचे वय १९ वर्षे सांगीतले होते व अल्पवयीन असल्याने व त्याच्या विरुद्ध कोणतीही तक्रार किंवा त्याच्यावर गुन्हा नसल्याने त्याला सोडण्यात आले होते, असे सपोनि गणेश केकाण यांनी सांगितले.

5) सकाळ पु. पान क्र. 1

# पार्किंग सुविधा नसल्यास कारवाई नको

## भाजप जिल्हाध्यक्ष रवी व्यास यांची मागणी

भाईंदर, ता. १२ (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहरात नो पार्किंग भागात उभ्या असलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून धडक कारवाई करण्यात येत आहे, पण ज्या भागात महापालिकेची अथवा खासगी आस्थापनांची पार्किंगची सुविधा नाही. त्याठिकाणी रस्त्यावर उभ्या वाहनांवर कारवाई केली जाऊ नये, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास यांनी पोलिस आयुक्तांकडे केली आहे.

शहरातील रस्त्यांवर विषम व सम तारखेला वाहनांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. तसेच काही भागात नो पार्किंगचे फलक लावण्यात आले आहेत. या सूचनांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे, पण अनेक ठिकाणी महापालिकेकडून तसेच खासगी आस्थापनांकडून पार्किंगची सुविधा देण्यात आलेली नाही. त्यामुळे महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये, पोलिस आयुक्तालय, विविध पोलिस ठाणे, शिधावाटप कार्यालय, खासगी रुग्णालये व दवाखाने, बँका आदी ठिकाणी जाण्यासाठी लोकांना नाईलाजास्तव रस्त्यावरच वाहने उभी करावी लागतात. त्यामुळे या समस्येची दखल घेऊन वाहतूक विभागाला योग्य ते निर्देश द्यावेत, अशी विनंती व्यास यांनी पोलिस आयुक्तांना केली आहे.

CS CamScanner

6) सामना पान क्र. 7

दि. 13/01/2023

काशिमीरा वाहतूक पोलीस 'इन ॲक्शन'

# भाईंदरमध्ये सवा लाख बेशिस्त वाहनचालकांची पावती फाडली

## वर्षभरातील कारवाईत ५ कोटी ८ लाख ९१ हजारांचा दंड वसूल

भाईंदर, दि. १२ (सा.वा.) – विना हेल्मेट, लायसन्स नसणे, ट्रिपल सीट, ड्रिंक अँण्ड ड्राईव्ह अशा विविध नियमांना पायदळी तुडवणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर काशिमीरा वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या वर्षभरात वाहतूक पोलिसांनी एकूण १ लाख २४ हजार ४७६ वाहनचालकांनी पावती फाडली. त्यांच्याकडून ५ कोटी ८ लाख ९१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

मीरा-भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होते. बऱ्याचदा वाहनचालक वाहतुकीचे नियम पाळत नसल्याने ट्रॅफिककोंडी होत असते. शिवाय वाहनचालक चौकाचौकात, रहदारीचे रस्ते याठिकाणी गर्दी असतानाही कोणतेही नियम पाळत नाहीत. वाहतूक पोलिसांशी हुज्जत घालण्याचे प्रकार तर वाढले आहेत. एकूणच नियम मोडणाऱ्या वाहनचालकांच्या गाडीचे नंबर घेऊन त्यांना ऑनलाईन दंड चलन पाठवले जाते, बेशिस्त गाडीचे फोटो काढून वाहतूक पोलीस तत्काळ त्यांच्या गाडीवर दंड ठोठावतात. बेशिस्त वाहनचालकांविरोधात काशिमीरा वाहतूक शाखेने कारवाई सुरूच ठेवली आहे.

### चालकांचे धाबे दणाणले

१ हजार ४६१ वाहनचालकाच्या ड्रायव्हिंग लायसन्स निलंबनाबाबतचे प्रस्ताव आरटीओकडे पाठवण्यात आले. विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या २ हजार ३३४ वाहनचालकांवर कारवाई. २४९ तर्राट वाहनचालकांची पोलिसांनी झिंग उतरवली. तर सिटबेल्ट न लावणाऱ्या २७ हजार ४६५ वाहनचालकांना दंड ठोठावला. काशिमीरा पोलिसांच्या या कारवाईमुळे बेशिस्त वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

7) पुढारी पान क्र. 3



### मीरारोडमध्ये रिक्षाला आग

**भाईंदर :** मीरारोडच्या रामदेव पार्क रिक्षा स्टॅण्डजवळून जाणाऱ्या रिक्षा क्रमांक एमएच ४८ एएक्स ९९७ ला आग लागल्याची घटना गुरुवारी सायंकाळी ४.१० वाजता घडली. घटनेची माहिती रिक्षाचे मालक धरमचंद वर्मा यांनी अग्निशमन दलासह नवघर पोलिस ठाण्याला दिली. अग्निशमन दलाने काहीवेळेतच घटनास्थळी धाव घेत रिक्षाला लागलेली आग तात्काळ विझवली. आगीत संपूर्ण रिक्षा जळून खाक झाली असून आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज अग्निशमन दलाकडून वर्तविण्यात आला आहे. घटनेची नोंद नवघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

CamScanner

लोकमत

पाच दिवसांत आणले देशात : विशेष शाखेला यश

# ओमानमध्ये घरकामासाठी महिलेला डांबले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ओमान येथे घरकामासाठी गेलेल्या वसईच्या ३० वर्षीय महिलेचा पासपोर्ट घेऊन तिला डांबून ठेवले होते. याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यावर आयुक्तालयाच्या विशेष शाखेच्या पोलिसांनी पाठपुरावा करत त्या महिलेची पाच दिवसांत सुखरूप सुटका करून भारतात आणण्यात यश मिळवले.

वसई कोळीवाड्याच्या साईदत्तनगरमध्ये राहणाऱ्या कमलावती पारस वर्मा (५०) यांची मुलगी अंजू वर्मा (३०) ही २५ ऑगस्टला मस्कत, ओमान या देशामध्ये नोकरीकरिता गेली होती. परंतु, सध्या तिला तेथे नोकरी करताना त्रास होत असल्याने तिला तेथे नोकरी करायची नव्हती. तसेच तिला भारतात परतायचे होते. परंतु, तिचा पासपोर्ट ओमानमधील एजंट प्रसन्ना याच्याकडे जमा होता. तो पासपोर्ट परत देण्यास नकार देत होता. ती तीन दिवसांपासून मस्कत, ओमान विमानतळावर थांबली असल्याचे आईने वसई पोलिस ठाण्यात ४ जानेवारीला तक्रार अर्जाद्वारे कळविले.



ओमानहून भारतात परतलेली अंजू वर्मा.

## एजंटचा पासपोर्ट, व्हिसाला नकार

हा अर्ज वसई पोलिस ठाणे यांच्याकडून विशेष शाखा, पारपत्र विभाग यांना मिळताच पारपत्र विभागाचे अधिकारी व अंमलदार यांनी तत्काळ वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ओमान, मस्कत येथे अडकलेल्या अंजू यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा एजंट प्रसन्ना याने अंजूचा पासपोर्ट दोन वर्षांकरिता वाढविला असून, त्यासाठी त्याचे पैसे खर्च झाल्याने तो तिला पासपोर्ट व व्हिसा देत नसल्याचे पोलिसांना कळले.

## भारतीय दूतावासाला विनंती

१ पोलिसांनी मस्कतमधील भारतीय दूतावासाला इ-मेल करून अंजूला मदत करण्याची विनंती केली. त्यांनी तिला आश्रय देत तेथील भारतीय दूतावासात पोहोचण्यास सांगितले.

२ भारतीय दूतावासाने तिच्या व्हिसा स्पॉन्सरशी संपर्क करून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून तेथील कायद्याप्रमाणे लेबर कोर्टात व्हिसा रद्द केल्याने अंजू ही ९ जानेवारीला सुखरूप भारतात परतली.

३ ही कामगिरी मुख्यालयाचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, विशेष शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक कुमारगौरव धादवड, महिला सहायक पोलिस निरीक्षक संजीवनी सोलनकर, पोलिस हवालदार मंजूषा गुप्ता व सीमा दाते यांनी पार पाडली.

## कंत्राट रद्द शिवाय जाऊ शकत नाही

ओमान देशात असा नियम आहे की, जर कंत्राटावर कामासाठी गेल्यावर जोपर्यंत कामगार कंत्राट रद्द करत नाही, तोपर्यंत तो परत जाऊ शकत नाही. पाठपुरावा केला व त्या महिलेला भारतात सुखरूप आणले, अशी माहिती पोलिस निरीक्षक कुमार धादवड यांनी दिली.

लोकमत

# लग्नकार्याचा फायदा घेत दुचाकीची चोरी

नालासोपारा : नालासोपारा येथे घरातील लग्नकार्याचा फायदा घेत दुचाकीची चोरी करण्यात आली आहे. उमराळे रोड येथील अस्मिता हाऊसमध्ये राहणाऱ्या शिक्षिका मरीना घोन्साल्वीस (५७) यांची २५ हजार रुपये किमतीची हॉंडा कंपनीची अॅक्टिवा दुचाकी घराजवळ पार्क करून ठेवली असताना ७ ते ९ जानेवारी दरम्यान घरात मुलाचे लग्नकार्य सुरू असताना चोरट्यांनी चोरून नेली आहे. बुधवारी नालासोपारा पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 13, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# बेकायदेशीरपणे वसईच्या रस्त्यांवर धावतात हजारो रिक्षा

## रिक्षाचालकांची मनमानी : नागरिकांच्या आरटीओत तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव शहरातील विविध रस्त्यांवर विनापरवाना, आवश्यक कागदपत्र, प्रवासी वाहन चालविण्याचे लायसन्स आणि बॅच नसतानादेखील बेकायदेशीरपणे शहरात सुमारे २० हजारपेक्षा जास्त रिक्षा रस्त्यावर धावत आहेत. प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालक बेकायदेशीर असल्याने या रिक्षाचालकांच्या अरेरावी आणि मनमानीमुळे प्रवासीवर्ग त्रस्त झाला आहे. याप्रकरणी पोलिस आयुक्तालयातील वाहतूक पोलिस विभाग अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनदेखील कारवाईसाठी मूक भूमिका घेत आहेत. त्यामुळे महिला आणि कामगार प्रवासी हैराण झाले आहेत.

तालुक्यात सुमारे २० हजारांहून अधिक बोगस प्रवासी रिक्षा चालत आहेत. तर ८ हजार अधिकृत परमिटधारक रिक्षा चालवत आहे. तसेच मनमानीपणे थेट शेअर भाडे प्रवाशांकडून घेतले जात असल्याचेही समोर आले आहे. यावरून प्रवासी आणि बोगस रिक्षा चालकांमध्ये नेहमीच खटके उडत असतात. पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी याप्रकरणी लक्ष घालून या मुजोर रिक्षाचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक प्रवासी संघाकडून करण्यात आली आहे.



वसई-विरारमध्ये स्टेशन परिसरात रिक्षा बेशिस्तपणे उभ्या करून भाड्यासाठी रिक्षाचालक मनमानी करताना दिसतात.

### नालासोपाऱ्यात वाहतूककोंडी

- शहरात विविध रस्त्यावर भंगार दुकानधारकांची वाहने, स्कूल बस, ट्रान्सपोर्टचे ट्रक, खासगी गाड्या रस्त्यावर रात्रंदिवस उभ्या केल्या जात आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. शेकडो मुजोर रिक्षाचालकांच्या परमिटची मुदत संपलेली आहे.
- बहुसंख्य रिक्षाच्या पासिंग झालेल्या नाहीत. बेकायदेशीर रिक्षा चालकांकडून ट्रॅफिक पोलिसांना दरमहा हप्ता दिला जात असल्यानेच त्यांच्यावर कारवाई केली जात नाही, असा आरोप ज्येष्ठ नागरिक प्रवासी संघाकडून होत आहे. तसेच कागदपत्र नसतानाही बेकायदेशीरपणे पाण्याचे टँकर, ट्रक आणि खासगी बस वसईत राजरोसपणे चालत असून रोजचे अपघात होत आहेत.

### प्रवाशांची लूट

१ रिक्षामध्ये तीन प्रवाशांची वाहतूक करण्याची मान्यता असतानादेखील पाच ते सहा प्रवासी कोंबून बसवण्यात येतात. हा प्रकार संतोष भवन, अलकापुरी, नागिनदास पाडा, वसई व विरार हायवेकडे जाणाऱ्या रिक्षा, वालीव, गोलानी, सातीवली, धानिवबाग अशा विविध भागात होत असल्याचे समोर आले आहे.

२ अनेक वेळा प्रवाशांकडून १५ रुपयांऐवजी २० ते २५ रुपये भाडे घेतले जात आहे. तसेच लाइन न लावता ब्रीजच्या, स्टेशनच्या आजूबाजूच्या व आदी ठिकाणी रस्त्यावरच मनमानीपणे आणि वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून रिक्षा उभ्या केल्या जातात.

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-210 मुंबई, शुक्रवार 13 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# 4 अपराधों की गुत्थी सुलझी, 2 चोर गिरफ्तार

**वसई :** एमवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार थाने की क्राइम इन्वेस्टिगेशन ब्रांच ने राजस्थान राज्य के शातिर दोपहिया चोरी के आरोपी को दबोचने में सफलता हासिल की,इनकी गिरफ्तारी से 4 अपराधों का खुलासा हुआ है।तथा आरोपियों के पास मोटरसाइकिल जप्त की गई है। यह जानकारी पुलिस ने गुरुवार को दी है। यह सफलता परिमंडल 03 डीसीपी सुहास बावचे,एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के पी.आई वसंत लबदे , पी आई (क्राइम ) महेंद्र शेलार,पोलीस व पोउपनि सनिल पाटील की टीम ने पाई है।पुलिस ने बताया कि पेल्हार थानान्तर्गत 3 जनवरी को शिकायतकर्ता संतोषकुमार घनश्यामदास केशरवाणी (43) को मोटरसाइकिल (एक्टिवा क्र.एमएच 48/बी.ए 6610 ) वाकनपाडा क्षेत्र से अज्ञात चोर चोरी कर फरार हो गए थे,इस मामले में पेल्हार क्राइम इन्वेस्टिगेशन ब्रांच के अधिकारियों और कर्मचारियों द्वारा जानकारी के आधार पर राजस्थान में शातिर अभियुक्तों में अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई (23) और रामाराम मोबताराम सुतार (25) को



वसई के कामन से गिरफ्तार किया।पुलिस ने कहा कि उसके पास से 04 अपराधों में 02 एक्टिवा एवं 02 यूनिकॉर्न मोटरसाइकिल जब्त की गई है व 4 अपराधों का खुलासा हुआ है।पुलिस के मुताबिक आरोपी अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई के ऊपर राज्य-राजस्थान के जिला जालोर के थानों में विभिन्न धाराओं के तहत 04 मामले दर्ज हैं व आरोपी रामाराम मोबताराम सुतार, राजस्थान राज्य के विभिन्न थानों में विभिन्न धाराओं के तहत 07 मामले हैं।

दैनिक
# मुंबई केसरी टाइम्स
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : २१७ शुक्रवार 13 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# ओमान देश से भारत आई ; MBVV पुलिस आयुक्तालय की विशेष शाखा ने परिवार में लौटाई खुशियां

**वसई ;** घरेलू काम के लिए ओमान ले जाई गई भारतीय महिला को स्पेशल ब्रांच ने 5 दिन के अंदर लाने में सफलता हासिल की। यह जानकारी पुलिस ने गुरुवार को दी है। यह कार्रवाई मुख्यालय डीसीपी प्रकाश गायकवाड व एसीपी (वि.शा) विनायक नरले के मार्गदर्शन में पी.आई कुमारगीरव धादवड की टीम ने की है। पुलिस ने बताया कि वसई पुलिस स्टेशन में 4 जनवरी को शिकायतकर्ता कमलावती पारस वर्मा ( 50 ) की शिकायत आवेदन के माध्यम से सूचना दी कि उनकी पुत्री का अंजू पारस वर्मा ( 30 ) 25 अगस्त को मस्कत,ओमान में रोजगार के लिए चली गई, लेकिन अब उन्हें वहां काम करने में परेशानी हो रही है और वह वहां काम नहीं करना चाहती हैं और वह भारत वापस आना चाहती हैं, लेकिन उसका पासपोर्ट और वीजा ओमान में एजेंट प्रसन्ना के पास जमा है और वह उसे वीजा और पासपोर्ट देने से इनकार कर रहा है और वह तीन दिनों से मस्कत, ओमान हवाई अड्डे पर रह रही है। पुलिस ने कहा कि जैसे ही उक्त आवेदन विशेष शाखा,पासपोर्ट विभाग,वसई पुलिस स्टेशन को प्राप्त हुआ,पासपोर्ट विभाग के अधिकारियों और कर्मचारियों ने तुरंत ओमान, मस्कत में फंसी भारतीय महिला अंजू पारस वर्मा, ( 30 ) से संपर्क किया,समझ,एजेंट प्रसन्ना छोड़ती है अंजू का वीजा 02 साल के लिए आगे है और इसके लिए अपना पैसा खर्च करने के कारण यह अपना पासपोर्ट और वीजा नहीं देता है, फिर भारत के दूतावास, मस्कट, ईमेल ईमेल किया व पीड़ित अंजु वर्मा की मदद करने का अनुरोध किया और उन सभी को बताया।तदनुसार, दूतावास के अधिकारियों ने अपने वीज़ा प्रायोजक से संपर्क करके सभी शर्तों का सामना किया है और वीज़ा वीजा को एक ट्राइकोलेड लॉ के रूप में पूरा किया,उसके बाद अंजू वर्मा भारत में 9 जनवरी को पहुंची और वह अपने परिवार को सौंप दिया गया है।शिकायतकर्ता महिला ने भारत मे भारत लौटने के बाद पुलिस के साथ संतुष्टि व्यक्त की है।

# पेल्हार पुलिस की कार्रवाई : वाहन के साथ 2 शातिर अपराधी चोर गिरफ्तार, दर्ज है राजस्थान में कई मुकदमे

**अजहर शेख : संवाददाता**

**वसई :** एमवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार थाने की क्राइम इन्वेस्टिगेशन ब्रांच ने राजस्थान राज्य के शातिर दोपहिया चोरी के आरोपी को दबोचने में सफलता हासिल की, इनकी गिरफ्तारी से 4 अपराधों का खुलासा हुआ है।तथा आरोपियों के पास मोटरसाइकिल जप्त की गई है। यह जानकारी पुलिस ने गुरुवार को दी है। यह सफलता परिमंडल 03 डीसीपी सुहास बावचे, एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के पी.आई वसंत लब्दे, पीआई (क्राइम) महेंद्र शेलार, पोलीस व पोउपनि सनिल पाटील की टीम ने पाई है। पुलिस ने बताया कि पेल्हार थानान्तर्गत 3 जनवरी को शिकायतकर्ता संतोषकुमार घनश्यामदास केशरवाणी (43) को मोटरसाइकिल (एक्टिवा क्र.एमएच 48/बी.ए 6610 ) वाकनपाडा क्षेत्र से अज्ञात चोर चोरी कर फरार हो गए थे, इस मामले में पेल्हार थाने में एफआईआर दर्ज किया गया था। पुलिस के मुताबिक, उपरोक्त अपराध के अनुसरण में पेल्हार क्राइम इन्वेस्टिगेशन ब्रांच के अधिकारियों और कर्मचारियों द्वारा घटनास्थल पर सीसीटीवी व गुप्त मुखबिरों से मिली जानकारी के आधार पर राजस्थान राज्य में शातिर अभियुक्तों में अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई (23) और रामाराम मोबताराम सुतार (25) को वसई के कामन से गिरफ्तार



किया। पुलिस ने कहा कि उसके पास से 04 अपराधों में 02 एक्टिवा एवं 02 यूनिकॉर्न मोटरसाइकिल जब्त की गई है व 4 अपराधों का खुलासा हुआ है।पुलिस के मुताबिक आरोपी अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई के ऊपर राज्य-राजस्थान के जिला जालोर के थानों में विभिन्न धाराओं के तहत 04 मामले दर्ज किये गये हैं व आरोपी रामाराम मोबताराम सुतार, राजस्थान राज्य के विभिन्न थानों में विभिन्न धाराओं के तहत 07 मामले दर्ज किए गए हैं।